**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार**

**न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः निलेश पांडुरंग यादव,

वयः ३७ वर्षे, व्यवसायः वाहन चालक,

राहणारः वांगणी, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. अंदाजे तीन–चार वर्षांपूर्वी संध्याकाळी ०७.०० वा. चे दरम्यान वांगणी येथे स्कॉर्पिओ गाडीने जात होतो. त्यावेळी पाऊस येत होता. मला वाकण फाट्याचे पुढे बाळसईचे दिशेने अपघात झालेला दिसला. त्यामुळे मी थांबलो. तेथे सनी भिसे, देवीदास तेलंगे, आरोपी उभा होता. मी अनंत रामचंद्र जाधव यांना कोणकणे हॉस्पिटल, नागोठणे येथे नेले. मोक्यावर मोटार सायकल नोंदणी क्र.एम एच ०६/९१४२ उभी होती. सदर घटनेच्या अनुशंगाने पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते.

०२. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. आर.बी.सावंत यांच्यामार्फत सुरू.**

०३. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळावर लोक जमा झाल्याचे दिसल्यामुळे मी तेथे थांबलो, त्यावेळी रात्र झाली होती, तेथे रस्त्यावर विजेचे दिवे नाहीत, पोलीसांनी माझे बयाण कथीत घटनेनंतर १८ दिवसांनी नोंदविले होते, मी

अपघात प्रत्यक्ष बघितला नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.10.15 15:45:53 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि. १५.१०.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.